पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

मा. "इ" प्रभाग समिती

विशेष सभा कार्यपत्रिका क्रमांक १९

सभावृत्तांत

दिनांक - २९/१०/२०२१ वेळ : दु.१२.२० वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. "इ" प्रभाग समितीची मा.सभापती निवडीची विशेष सभा **शुक्रवार** दिनांक **२९/१०/२०२१** रोजी दुपारी **१२.२०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृह, मुख्य इमारत, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८ या ठिकाणी **मा.श्री.रविंद्र बिनवडे, (भा.प्र.से)** पिठासीन अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त(जनरल), महानगरपालिका पुणे, यांचे अध्यक्षतेखाली सभा आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य प्रत्यक्ष सभागृहात उपस्थित होते.

१. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
२. मा.घुले नानी उर्फ हिराबाई गोवर्धन
३. मा. गायकवाड निर्मला मनोज
४. मा.सागर बाळासाहेब गवळी

या शिवाय **मा.उल्हास जगताप** अतिरिक्त आयुक्त (३) तथा नगरसचिव, **मा.राजेश आगळे,**सहाय्यक आयुक्त तथा क्षेत्रीय अधिकारी, "इ" प्रभाग समिती, मा.नाना मोरे प्रशासन अधिकारी "इ" प्रभाग समिती कार्यालय, हे अधिकारी उपस्थित होते.

-------

| | |
|---|---|
| **पिठासीन अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, (जनरल) महानगरपालिका पुणे** | सन्मा. सदस्य, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या सभेत प्रभाग समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. यासाठी मा.विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन अधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणूक केलेली आहे. "इ" प्रभाग समितीच्या सभापती पदाची निवडणूक मुक्त व निर्भयपणे पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेणेबरोबरच त्या कामकाजाची व्हिडीओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.<br>**प्रभाग समिती सचिव यांनी कामकाज सुरु करावे अशी सुचना करतो.** |

| | |
|---|---|
| **प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा )** | मा."इ" प्रभाग समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ (४) नुसार नेमणूक करणे.<br>"इ" प्रभाग समितीचे सभापती पदाकरीता मुदतीत दाखल झालेली एका उमेदवाराची एकूण ०२ (दोन) नामनिर्देशन पत्रे पिठासीन प्राधिकारी यांचेकडे छाननी करणेकामी सुपुर्त करण्यात येत आहेत.<br>( प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभाशाखा यांनी त्यांना प्राप्त झालेली एका उमेदवाराची एकूण ०२ (दोन) नामनिर्देशन पत्रे मा.पिठासीन अधिकारी यांचेकडे छाननीकामी सुपुर्त केली.) |
| **पिठासीन अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, (जनरल) महानगरपालिका पुणे ,** | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या "इ" प्रभाग समितीचे सभापती पदाकरीता एका उमेदवाराची एकूण ०२ (दोन) नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल झालेली आहेत. त्यामध्ये उमेदवार, त्यांचे सुचक, अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत. |

| अ क्र | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | डोळस विकास हरिश्चंद्र | घुले नानी उर्फ हिराबाई गोवर्धन | गायकवाड निर्मला मनोज |
| २ | डोळस विकास हरिश्चंद्र | सागर बाळासाहेब गवळी | सोनाली दत्तात्रय गव्हाणे |

मा. "इ" प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या एका उमेदवाराच्या ०२ (दोन) नामनिर्देशन पत्रांची छाननी करणेत आली असुन सदर नामनिर्देशन पत्रे परिपूर्ण असून त्यावर उमेदवाराचे नाव, पत्ता, प्रभाग क्रमांक नमुद आहे. तसेच नामनिर्देशन पत्रांवर उमेदवाराची स्वाक्षरी आहे. त्याचप्रमाणे नामनिर्देशन पत्रांवर समितीच्या एका सदस्याने सुचक म्हणून स्वाक्षरी केली आणि समितीच्या दुस-या सदस्याने अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केलेली आहे. सबब सदरची नामनिर्देशन पत्रे वैध असून स्विकृत करण्यात येत आहेत.त्यामध्ये मा. "इ" प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे **मा.डोळस विकास हरिश्चंद्र** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

**- नामनिर्देशन पत्र माघारी घेणे -**

उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा.पिठासीन अधिकारी यांजकडे देऊन त्यांची उमेदवारी मागे घेता येईल अशी नियमात तरतूद आहे. उमेदवारी मागे घेण्यासाठी दुपारी १२.२५ ते १२.४० वा.याप्रमाणे वेळ निश्चित करून देण्यात येत आहे.

## - उमेदवार निवडून आल्याची घोषणा -

नामनिर्देशनपत्र माघारी घेण्याचा कालावधी संपला आहे. या कालावधीमध्ये उमेदवाराने उमेदवारी मागे घेतलेली नाही. सबब मा. "इ" प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.डोळस विकास हरिश्चंद्र** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत. यास्तव **मा.डोळस विकास हरिश्चंद्र** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे "इ" प्रभाग समिती सभापती पदावर रितसर वैधरित्या **बिनविरोध** निवड झाल्याचे मी रविंद्र बिनवडे,(भा.प्र.से.) पिठासीन अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त (जनरल) महानगरपालिका पुणे, "इ" प्रभाग समिती (विशेष सभा) जाहीर करतो.

----------

ठराव क्रमांक - ६४

दिनांक - २९/१०/२०२१

विषय क्रमांक - १

विभाग - प्रशासन इ -प्रभाग

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. "इ" प्रभाग समिती सभापती पदाकरीता मुदतीत दाखल झालेल्या व वैध ठरलेल्या नामनिर्देशन पत्रामधील मा. "इ" प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे **मा. डोळस विकास हरिश्चंद्र** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.डोळस विकास हरिश्चंद्र** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या "इ" प्रभाग समिती सभापती पदावर रितसर वैधरित्या **बिनविरोध** निवड झाल्याचे जाहीर करणेत येत आहे.

Ravi-

**(रविंद्र बिनवडे,**( भा.प्र.से.))
**पिठासीन अधिकारी तथा**
अतिरिक्त आयुक्त, (जनरल)
महानगरपालिका पुणे
"इ" प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
29/10/2021

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
"इ" क्षेत्रीय कार्यालय,
क्रमांक : इक्षेका/१/कावि/ ४४ /२०२१
दिनांक : २९/१०/२०२१

**प्रशासन अधिकारी**
तथा सचिव सभा शाखा
"इ" प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.